**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१०१६१०३/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- ०१/०६/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक ०४/०६/२०२४ रोजी मावळ लोकसभा निवडणुक २०२४ ची मतमोजनी ही बालेवाडी स्टेडीयम येथे होत आहे. विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत राहणार असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. मावळ लोकसभा निवडणुक २०२४ मतमोजनी शांतेत व सुरळीतपणे पारपाडणेकरीता सदर ठिकाणचे वाहतुक मार्गात बदल तसेच पार्किंग व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते तात्पुरते स्वरुपात रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### हिंजवडी, वाहतुक विभाग अंतर्गत

- दि.०४/०६/२०२४ रोजी सकाळी ५/०० ते रात्री ११/३० या वेळेमध्ये बालेवाडी स्टेडीयम मेन गेट समोरील रस्ता उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक ते म्हाळुंगे पोलीस चौकी पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांकरीता बंद राहील.

  **पर्यायी मार्ग १** चांदे- नांदे व म्हाळुंगे गावातुन येणारी वाहने ही उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक येथुन उजवीकडे वळुन म्हाळुंगे पोलीस चौकी येथुन पुढे राधा चौकाकडे व इच्छितस्थळी जातील.

  **पर्यायी मार्ग २** राधा चौकातुन येणारी वाहने ही म्हाळुंगे पोलीस चौकी येथे डावीकडे वळुन पुढे म्हाळुंगे गाव, चांदे- नांदे व पुढे इच्छित स्थळी जातील.

- **दि.०४/०६/२०२४ रोजी सकाळी ५/०० ते रात्री ११/३० या वेळेत जड व अवजड वाहनांना म्हाळुंगे गाव ते राधा चौक आणि राधा चौक ते म्हाळुंगे गाव या मार्गावर प्रवेश बंद राहील.**

  **पर्यायी मार्ग-** चांदे नांदे येथुन येणारी जड अवजड वाहने ही गोदरेज सर्कल येथुन डावीकडे वळुन माण मार्गे हिंजवडी येथे येवुन इच्छित स्थळी जातील, व बाणेर रोड व राष्ट्रीय महामार्गावरुन येणारी जड अवजड वाहने ही राधा चौकातुन उजवीकडे वळुन वाकड नाका मार्गे हिंजवडी व पुढे इच्छित स्थळी जातील.

### पार्किंग व्यवस्था

पार्किंग १ - म्हाळुंगे पोलीस चौकी ते उत्तम स्विट (पुणेरी स्वीट) चौक या मधला रस्ता महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना थांबणेसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. सदर ठिकाणी येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या वाहनांसाठी राधा चौकातुन पुढे डाव्या बाजुला खंडोबामंदीराचे पाठिमागील मोकळ्या जागेमध्ये पार्कीगकरीता व्यवस्था करण्यात आली आहे.

पार्किंग २ - ऑर्किड हॉटेल हायवे गेट पासुन सुरु होणारा सर्व्हीस रोड हा मुळा नदी ब्रिज पर्यंत रहदारीसाठी बंद ठेवण्यात येत असुन हा रस्ता महायुतीचे कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी राखीव ठेवण्यात येत आहे. महायुतीच्या कार्यकर्त्यासाठी पार्किंगची व्यवस्था त्या सर्व्हीस रस्त्यावर करण्यात येत आहे.

पार्किंग ३ -इतर पक्षाचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांचे साठी माध्यमिक विद्यालय म्हाळुंगे या शाळेमध्ये पार्कीगची

Scanned with OKEN Scanner

व्यवस्था करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे दि.०४/०६/२०२४ रोजी सकाळी ०५.०० पासुन रात्रौ ११.३० पर्यंत आवश्यकतेनुसार गर्दी संपेपर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होईपर्यंत वाहतुक वळविण्यात येत असुन अधिसुचना (नोटीफिकेशन) काढण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी/वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

01.06.24

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी हिंजवडी, वाहतुक विभाग

/- सदर वाहतुक बदलाचे अनुषंगाने वाहन प्रवेश निर्बंधाचे फलक लावून बॅरीकेटींग करुन वाहतुक वळविण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner